म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. २५२८

२५२८.

# नूतन नाटक

IRBK-0102527
IRBK-0102527

गो. बा. पंडितराव

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाट्य-वाङ्मय
वा. नं. १८०

विषय
२००



किशोर साहित्य : १५

# नूतन नीतिकथा.

[ भाग १ ला ]

म. ग्रं. सं. ठाणें.

लेखक :

गो. आ. पंडितराव

IRBK-0102527

: प्रकाशक :

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रथमावृत्ति १९२०
दुसरी आवृत्ति १९४४
तिसरी आवृत्ति १९४६

**किंमत ६ आणे**

प्रकाशक—शं. वा. कुळकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.
मुद्रक—रा. का. तटणीस, श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, मुंबई २.

म. ग्रं. सं. ठाणें
cl. no. 200
2526.

# नूतन नीतिकथा

## रुद्रदास व क्षेत्रपाल

सोनगांवांत रुद्रदास व क्षेत्रपाल या नांवाचे दोन शेतकरी शेजारीं शेजारीं रहात असत. रुद्रदासाची एक गाय होती. ती त्याच्याच गोठ्यांत लहानाची मोठी झाली होती. परंतु तिला कित्येक वर्षांत एकही वांसरूं झालें नाहीं, म्हणून त्यानें ती योग्य किंमत घेऊन क्षेत्रपालाला विकत दिली. क्षेत्रपालानें त्या गाईची चांगली निगा ठेवल्यामुळें आतां तिला वांसरें होऊं लागलीं. तिनें एकामागून एक असे तीन छानदार पाडे क्षेत्रपालाला दिले. शिवाय त्याची अन्य साधनांनींही बरीच भरभराट झाली. तेव्हां रुद्रदासानें ती गाय परत विकत मागितली; परंतु क्षेत्रपाल ती देईना. म्हणून रुद्रदासाच्या मनांत मत्सराग्नीनें पेट घेतला, आणि त्यानें क्षेत्रपालाचें नुकसान करण्याचा निश्चय केला.

एके दिवशीं मध्यरात्रीं काळोखांत रुद्रदास क्षेत्रपालाच्या गवताच्या गंजीपाशीं गेला आणि त्यानें तिला आग लावून दिली. तो उजेड पाहून पुष्कळ लोक तेथें जमले. गंजीचा मालक क्षेत्रपालही आला व ते सर्वजण आग शांत करूं लागले. परंतु कांहीं इलाज चालेना; तेव्हां एकजण क्षेत्रपालाला म्हणाला, " गड्या, हा अग्निनारायण देव आहे. याचा कांहीं तरी आदरसत्कार कर, म्हणजे तो प्रसन्न होऊन पुढें तुझें नुकसान भरून देईल. " क्षेत्रपालाला हें म्हणणें खरें वाटून त्यानें आपल्या अंगावरील जाडें-भरडें धोतर काढून त्या अग्निनारायणाला नेसविलें.

दुसऱ्या दिवशीं आग अगदीं शांत झाली आणि क्षेत्रपाल तीं राख शेतांत नेऊन टाकण्याकरितां गाडींत भरूं लागला, तों त्याला त्या राखेंत एक गोळा सांपडला. तो बराच जड होता. होय, सोनें व रुपें यांचा रस होऊन तो गोळा बनलेला होता. कोणी चोरट्या लोकांनीं चोरी करून आणलेले सोन्यारुप्याचे दागिने त्या गवताच्या गंजींत लपवून ठेविले होते. आणि रात्रीच्या आगीनें त्यांचा रस होऊन गोळा बनला होता.पण लोकांना वाटलें कीं क्षेत्रपालाच्या आदरसत्कारानें प्रसन्न होऊन अग्निनारायणानें ती संपत्ति त्याला दिली. ही बातमी ऐकून रुद्रदासाच्या अंगाची नुसती आग झाली. त्यानें सोनगांवच्या जोशाचा सल्ला विचारला, तेव्हां अग्निनारायणानें प्रसन्न होऊन संपत्ति देणें अगदीं शक्य आहे, असें त्या जोशानें आपलें मत दिलें.

यानंतर एक आठवडा गेला असेल नसेल, तोंच रुद्रदासाच्याही गवताच्या गंजीला रात्रीं आग लागली. ती त्यानें स्वतःच संपत्तीच्या लोभानें लाविली होती. ही आग विझविण्याकरितां लोक तेथें जमा झाले; परंतु रुद्रदासानें आग शांत करण्याचा प्रयत्न केला नाहीं आणि दुसऱ्यांसही करूं दिला नाहीं. त्यानें आगाऊच एक उत्तम रेशमी वस्त्र विकत आणून ठेविलें होतें, तें त्या अग्नीस नेसविलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो त्या राखेंत सोन्याचा गोळा शोधूं लागला; परंतु काय ? अग्नीनें त्याला कांहींच दिलें नाहीं.

रुद्रदासाची बायको त्याला शोभण्यासारखीच स्वभावानें मत्सरी होती. तिनें नुकतेंच एक खोडकर मांजर पाळलें होतें. तें क्षेत्रपालाच्या बायकोचीं कोंबडीचीं पिलें मारून खाऊं लागलें.

अखेर कंटाळून क्षेत्रपालाची बायको आपल्या कोंबडीचीं पिलें बाजारांत विकून टाकण्याकरितां जवळच्या कसब्याच्या गांवाला निघाली. ती मार्गावर एका ओढ्यापाशीं गेली तों तेथें एक श्रीमान् सरदार मूर्च्छित होऊन पडला होता व त्याचे नोकर त्याला सावध करण्याचा प्रयत्न करीत होते असें तिला दिसून आलें. आतां त्या नोकरांनीं तिच्या डोक्यावरील पाटींतील कोंबडीचीं चार पिलें विकत घेतलीं व त्या मूर्च्छित सरदारावरून भराभर उतरून टाकिलीं. असें केल्यानें भूतबाधा दूर होऊन तो शुद्धीवर येईल असें त्या देवभोळ्या नोकरास वाटलें, आणि कर्मधर्मसंयोगानें तसें घडलेंही. त्या सरदारानें शुद्धीवर आल्यानंतर, क्षेत्रपालाची बायको वेळेवर आपल्या उपयोगी पडली म्हणून खूष होऊन, तिला एक सोन्याची मोहोर बक्षीस दिली.

कोंबडीचीं अवघीं चार पिलें विकून क्षेत्रपालाच्या बायकोला एक मोहोर मिळाली अशी अर्धवट बातमी रुद्रदासाच्या बायकोला समजली, तेव्हां तीही आपलीं कोंबडीचीं पिलें पाटींत घालून डोकीवर घेऊन जवळच्या कसब्याच्या गांवाला ताबडतोब गेली; आणि " कोंबडीचीं पिलें घेतां कां पिलें ?" असें पुकारूं लागली. लोकांनीं तिला त्यांची किंमत विचारली तेव्हां, " चार पिलांस एक मोहोर, " असें तिनें सांगितलें. त्या लोकांना ही भामटेगिरी वाटली. म्हणून कोणीं तिला शिव्या दिल्या, कोणीं खडे मारले आणि एकजणाचा तर कुत्राच धन्याच्या हुकुमाला अनुसरून तिच्या पायाला कडकडून चावला ! त्या धांदलींत तिच्या डोकी-वरील पाटी खालीं पडली व कोंबडीचीं पिलें चहूंकडे उडून गेलीं.



घरीं येऊन तिनें रुद्रदासाला आपली झालेली फजिती सांगितली व त्या फजितीचें सर्व खापर क्षेत्रपालाच्या बायकोच्या डोक्यावर फोडलें. आधींच रुद्रदासाची स्वतःची फजिती झालेली होतीच, तशांत ही बायकोची भर ! मग काय विचारतां ? त्यानें क्षेत्रपालाला त्याच दिवशीं रात्रीं या जगांतून नाहींसें करण्याचा निश्चय केला.

आतां क्षेत्रपालाच्या घरीं एक प्रवासी त्या रात्रीं मुक्कामाला आला होता. त्याच्याजवळ एक हजार रुपये होते. क्षेत्रपालानें

त्याला आदरपूर्वक आपला स्वतःचा नेहमींचा बिछाना निजावयास दिला व आपण एका कोपऱ्यांत घोंगडीवर निजला. तो प्रवासी ते हजार रुपये बिछान्याखालीं जपून ठेवून त्यावर झोंपीं गेला. मध्यरात्रीं ठरल्याप्रमाणें रुद्रदास व त्याचे तीन साथीदार क्षेत्र-पालाच्या घरांत शिरून थेट त्याच्या नेहमींच्या बिछान्याकडे गेले. तेथें तोंडावर पांघरूण घेऊन निजलेला तो प्रवासी म्हणजे क्षेत्रपालच आहे असें वाटून त्यांनीं त्या प्रवाशाची एका घोंगड्यांत मोट बांधली आणि त्याला सोनगांवच्या किल्ल्याजवळील विहिरींत टाकून दिलें.

क्षेत्रपाल त्या वेळीं जागा असल्यामुळें त्यानें हें रुद्रदासाचें दुष्ट कृत्य पाहिलें; परंतु भिऊन तो गप्प बसला. आपल्यावरचें संकट टळल्याबद्दल त्यानें ईश्वराचे आभार मानले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या बिछान्याखालीं ठेवलेले प्रवाशाचे हजार रुपये क्षेत्रपालाला सांपडलेले, तो ते मोजीत बसला असतां, रुद्रदासानें दरवाजांतून आंत डोकावून पाहिलें, तों क्षेत्रपाल आपला जिवंत आहे !

रुद्रदास आंत गेला आणि म्हणाला, "क्षेत्रपाल, हे इतके रुपये कोठून आले ?"

क्षेत्रपाल गंभीरपणानें खरेपणाचा आव आणून म्हणाला, "रुद्रदासजी, काल रात्रीं कांहीं दुष्ट लोक माझ्या घरांत शिरले आणि त्यांनीं एका घोंगड्यांत माझी मोट बांधून मला किल्ल्या-जवळील विहिरींत टाकलें. ती मोट विहिरींत पडतांच तिची गांठ सुटली आणि सुदैवानें मी मोकळा झालों. विहिरींत पाण्याच्या

तळाशीं एक कमान आहे त्या कमानींत मी शिरलों. तींतून एक चोरवाट किल्ल्याच्या तळघरांत जाते. त्या वाटेनें मी गेलों. तेव्हां त्या तळघरांत रुपयांनीं भरलेले पुष्कळ हंडे मला दिसले. त्यांतून तूर्त हे एक हजार रुपये मीं आणिले आहेत. बाकीचे रुपये आणण्याला मी उद्यां जाणार आहें."

हें बोलणें सर्व खरें मानून रुद्रदासानें द्रव्यलोभाच्या आधीन होऊन त्याच दिवशीं त्या विहिरींत उडी घेतली. क्षेत्रपालानें सांगितलेली कमान कोठें आहे म्हणून तो चांचपूं लागला. पण कमान तर सांपडली नाहींच. उलट, थोड्याच वेळांत श्वास कोंडून रुद्रदास मरण पावला. त्यानें विनाकारण दुसऱ्याचें नुकसान करण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्यांत त्याचें स्वतःचेंच नुकसान झालें.

## पितृद्रोही सुलोचन.

वटग्रामांत मुद्रादास या नांवाचा एक शेतकरी रहात होता. त्यानें शेतकी करून व काटकसरीनें वागून पुष्कळ पैसा शिल्लक टाकिला होता. हा पैसा त्यानें व्यापारधंद्यांत घालावयाला पाहिजे होता. परंतु तसें न करतां त्यानें तो एका हंड्यांत घालून चोराच्या भयानें घरीं जमिनींत पुरून ठेविला. तो रात्रीं आपलें अंथरूण त्या द्रव्य पुरून ठेवलेल्या जागेवर घालून त्यावर मोठ्या सावधपणानें निजत असे. हें त्याचें करणें त्याचा तरुण मुलगा सुलोचन ह्याला मुळींच आवडत नसे. सुलोचनाला चैन करण्याची इच्छा फार होती; परंतु बापाकडून त्याला चैनीकरितां एक छदामही मिळत

नसे. बापाच्या द्रव्यापैकीं कांहीं तरी अंश मिळविण्याला तो अगदीं उतावीळ झाला होता.

त्याचे कुलगुरु रंगशर्मा नांवाचे होते. ते ~~केवळ कर्मठ !~~ त्यांच्या टिळेमाळा अगदीं पाहून घ्याव्या. पण परद्रव्यहरण करण्याच्या कामीं त्यांचा अगदीं हातखंडा होता. एके दिवशीं रंगशर्मा व सुलोचन एकांतांत बोलत बसले असतां गोष्टीवरून गोष्टी निघाल्या, आणि आपणाला बापाकडून चैनीकरितां पैसा मिळत नाहीं ह्याबद्दल सुलोचनानें रंगजीजवळ संताप व्यक्त केला. तेव्हां रंगजींनीं मोठी सहानुभूति दाखविली आणि बापाजवळचा पैसा हातीं येण्याला काय युक्ति करावी असें सुलोचनानें विचारल्यावरून त्याला ती युक्ति सांगितली.

मग रंगजींनीं सांगितलेल्या युक्तीप्रमाणें वागण्याला सुलोचनानें एकदम सुरुवात केली. त्यानें वारंवार आजारी पडल्याचें सोंग घेतलें. त्याचें डोकें तर रोज दुखूं लागलें आणि आपल्या डोळ्याला कमी कमी दिसूं लागलें आहे असा बहाणा तो करूं लागला. घरांत कोंबड्या होत्या त्यांचीं अंडीं चोरीला जाऊं लागलीं व गोठ्यांतील गाई-म्हशींचें दूध विकून पूर्वीइतके पैसे येईनातसे झाले. मुद्रादासाच्या शेतांतील जोंधळ्याची हुरड्याला आलेलीं कणसेंही कोणी छाटून नेऊं लागले. वास्तविक हे सर्व प्रकार रंगजींनीं सांगितलेल्या युक्तीला अनुसरून सुलोचनच घडवून आणवीत होता.

मुलग्याला या दुखण्यांतून सोडविण्याकरितां मुद्रादासानें खरें म्हटलें असतां वैद्याकडे जावयास पाहिजे होतें. परंतु तसें न

करतां तो कांहीं दिवसांनंतर रंगजीकडे गेला आणि त्यांच्यापुढें दक्षिणा ठेवून त्यानें प्रश्न विचारला. रंगजींनीं पंचांग उघडलें. बोटांनीं नक्षत्रें व राशी मोजल्या, डोळे मिटून पुष्कळ विचार केला आणि ते म्हणाले, "मुद्रादास, हा कुलदेवतेचा कोप दिसतो. अलीकडे देवीपुराला देवीच्या दर्शनाला गेला नाहींस. तरी तूं स्वतः तेथें जा. देवीच्या देवळांतील नंदादीपांत तेल घाल, व पांच ब्राह्मणांना भोजन व दक्षिणा दे, म्हणजे तुझ्या मुलग्याचे डोळे खात्रीनें नीट होतील आणि इतर सर्व नुकसानीच्या गोष्टी बंद पडतील."

मुद्रादासाला हें सांगणें पटलें आणि पुत्रप्रेमाच्या आधीन होऊन तो त्वरेनें सर्व तयारी करून देवीपुराला निघाला. देवीपूर वटग्रामापासून पांच दिवसांच्या वाटेवर होतें. पैकीं अवघे तीन कोस चालून गेल्यानंतर मार्गावर त्याच्या सुनेचा ( सुलोचनाच्या बायकोचा ) माहेरगांव होता, तेथें त्यानें मुक्काम केला. ती सून नुकतीच माहेरीं आली होती. तिला त्यानें रंगजीचें व्याख्यान सांगून आपण देवीपुराला कां जात आहों तें सांगितलें. त्यावर ती म्हणाली, "मामंजी, तुम्ही चांगला विचार केला काय ? मला तर ह्यांत काळेंबेरें दिसतें. माझे यजमान व रंगजी अलीकडे वारंवार एकांतांत बोलत बसल्याचें पाहिल्यावरून त्यांचा कांहीं तरी कट चालला असावा असा संशय मला सासरीं असतांनाच आला होता. माझ्या यजमानांना तर कांहीं दुखणें जडलेलें नाहीं याची मला खात्री आहे, आणि इतर नुकसान होत आहे तेंही तुम्हीं चांगली देखरेख ठेवल्यास बंद पडण्यासारखें आहे. तुम्हीं परत वटग्रामाला जावें म्हणजे ह्यांत रंगजीचा व माझ्या यजमानाचा

कांहीं तरी कावा असल्याचें दिसून येईल." सुनेचें हें बोलणें मुद्रादासाला खरें वाटलें नाहीं. बायकांच्या शहाणपणाविषयीं त्याचें मत फारसें चांगलें नव्हतें, व रंगजीवर त्याचा पूर्ण विश्वास होता, म्हणून तो तसाच पुढें देवीपुराला गेला.

इकडे वटग्रामांत सुलोचन व रंगजीबुवा हे त्याच दिवशीं एकत्र बसून त्यांनीं आपला बेत तावडतोब पार पाडण्याचा निश्चय केला. त्या दिवशीं मध्यरात्र उलटून गेल्यावर त्या दोघांनीं हातांत कुदळ व खोरें घेऊन कोणाला न कळतां मुद्रादासाचें द्रव्य पुरलेली जागा उकरली आणि द्रव्याचा हंडा बाहेर काढला. आतां हें द्रव्य ठेवावें कोठें ? मग रंगजी सुलोचनावर उपकार करण्याचा आव आणून म्हणाले, "सुलोचन, आतां असें कर; हें द्रव्य माझ्या घरीं ठेव म्हणजे सहसा तुझ्या बापाला कळणार नाहीं; तुला लागेल तसें माझ्याकडून नेत जा."

मूर्ख सुलोचनानें विचार न करतां तो हंडा आपल्या डोक्यावर घेतला आणि रंगजीच्या घरीं सोप्यावर नेऊन ओतला. नंतर तोच रिकामा हंडा कोळशांनीं भरून त्या दोघांनीं पूर्वीच्या जागीं पुरला व ती जागा चिखलमाती घालून चोपून पूर्वींप्रमाणें साफ केली.

देवीपुराला जाऊन व रंगजीच्या सांगण्याप्रमाणें वागून मुद्रादास निघाल्यापासून बारा दिवसांनीं वटग्रामाला परत आला आणि पहातो तों मुलगा दुखण्यांतून बरा झाला ! आतां त्याचें डोकें दुखत नव्हतें व डोळे तर पूर्वींपेक्षांही चांगले झाले होते. तो चैनींत आनंदांत दिसला. कोंबड्या व गाई म्हैशी यांचें पूर्वींप्रमाणें

उत्पन्न येऊं लागलें. पुढें कांहीं दिवसांनीं मुद्रादासाची सून माहेराहून परत आली, तेव्हां रंगजीविषयीं तिनें व्यक्त केलेल्या संशयाची आठवण होऊन मुद्रादासाला वाटलें कीं, एकदां द्रव्य पुरलेली जागा उकरून हंडा सुरक्षित आहे कीं कसें पहावें. म्हणून त्यानें जागा उकरून हंडा वर काढला तों त्यांत कोळसे ! तो कावरा-



बावरा झाला. हातांत कोळसे घेऊन वेड्यासारखा त्यांकडे निरखून पाहूं लागला. त्यानें मुलग्याला, " तूं हंड्यांतील द्रव्य घेतलेंस काय ?" म्हणून विचारलें; परंतु मुलग्यानें कानावर हात ठेवले.

मुद्रादासाला वेड लागून तो " हंडा हंडा " म्हणत पंधरा दिवसांत मरण पावला. पुढें कांहीं दिवस 'रंगजींनीं थोडेसे पैसे सुलोचनाला दिले. शेवटीं त्या तरुण मुलग्यानें रंगजीकडे जाऊन म्हटलें, " स्वामी, आतां माझें द्रव्य मला द्या."

रंगजी म्हणाले, "शांतं पापं ! शांतं पापं ! अरे हें काय कुभांड

घेतोस? कसलें द्रव्य? तुझें द्रव्य आमच्याकडे कांहीं नाहीं. तुझ्या बापाचा हंडा तर तुझ्या घरींच आहे. आतां एवढें मात्र खरें कीं, तुझ्या बापानें देवब्राह्मणाकडे त्या पैशाचा व्यय केला नाहीं म्हणून त्याचे कोळसे झाले ही गोष्ट सर्व लोकांना ठाऊक आहे. यंदा मीं चुकून गणेशचतुर्थीचा चंद्र पाहिला होता, त्याचा ठोकताळा मात्र ह्या प्रसंगीं मला उत्तम आला."

यावर सुलोचनानें गांवभर पुष्कळ आरडाओरडा केला. परंतु त्याचें म्हणणें कोण खरें मानतो! पुरावा तर मुळींच नव्हता आणि आमच्या रंगजीसारख्या धर्मशील व कर्मठ मनुष्यानें दुसऱ्याला फसविणें शक्यही नव्हतें. मात्र बापाप्रमाणें मुलग्यालाही वेड लागलें. असें लोक म्हणूं लागले. पितृद्रोहाचें फळ, दुसरें काय!

## चंद्रकिशोर

प्राचीनकाळीं शांतिपूर येथील राजाला एक पुत्र व एक कन्या अशीं दोन मुलें होतीं. त्यांपैकीं कन्या चारुशीला आतां सोळा वर्षांची झाली होती. ती खरोखर आश्चर्य वाटण्यासारखी सुंदर होती. तिनें अनेक ललित कलांचा अभ्यास केला असून ती विनय, पापभीरुता इत्यादि गुणांनीं मंडित होती.

त्या काळच्या चालीप्रमाणें चारुशीला राजकन्येनें आपला पति स्वतः निवडावा असें राजानें ठरविलें. त्यानें राजवाड्यापुढें एक मोठें क्रीडांगण तयार करविलें आणि सर्व देशांत असें प्रसिद्ध केलें कीं, "वसंतऋतूच्या आरंभीं दोन दिवस राजवाड्यापुढील क्रीडांगणामध्यें अनेक शौर्यवीर्यदर्शक क्रीडाप्रकार व द्वंद्वयुद्धें होतील. त्यांत भाग घेण्याला सर्वांना मोकळीक आहे. त्या प्रसंगीं

राजकन्या आपल्या पतीची निवड करील व त्यास बहुमानदर्शक रत्नखचित शिरस्त्राण व चिलखत आपल्या हातानें अर्पण करील."

हें वर्तमान श्रीवत्सपुरांतील लोकांनाही समजलें. तेथील किल्लेदाराला दोन मुलगे होते. थोरला मुलगा चंद्रकिशोर याची आई त्याच्या लहानपणींच निवर्तली. तिची रिकामी पडलेली जागा एका तरुण स्त्रीनें लवकरच भरून काढून किल्लेदाराला आपल्या सौंदर्यानें अगदीं मुठींत आणलें. तिलाही एक मुलगा झाला. त्याचें नांव जयवंत. जयवंतच्या जन्मानंतर चंद्रकिशोराच्या दुर्दिनाला लवकरच सुरुवात झाली. त्याच्या शिक्षणाकडे किंवा आरोग्याकडे कोणीच लक्ष देईना. इतकेंच नाहीं, तर त्याच्या थोर कुलाला शोभणार नाहीं अशा रीतीनें, किल्ल्यांतील बागेंत माळ्याच्या हाताखालीं काम करण्यास त्याला सावत्र आईच्या चिथावणीवरून पित्याची आज्ञा झाली. चंद्रकिशोर व जयवंत हे दोघे भाऊ आतां अनुक्रमें वीस व सतरा वर्षांचे होते. जयवंताला धनुष्य, भाला, तलवार इत्यादि शस्त्रांच्या युद्धकलेचें शिक्षण मिळालें होतें; परंतु अति लाडानें तो बिघडला होता. चंद्रकिशोराला मात्र त्याच्या पित्यानें असलें शिक्षण दिलें नव्हतें. तथापि श्रीवत्स-पुरापासून नजीकच असलेल्या गोरक्षमठांत चंद्रकिशोर कधीं कधीं चांदण्यारात्रीं जाऊन तेथें गोसावी वेषांत राहणाऱ्या एका वृद्ध वीरापाशीं गुप्तपणें युद्धकला शिकला होता.

राजकन्येच्या स्वयंवराचा दिवस अगदीं जवळ आला. त्या-निमित्त किल्लेदार, त्याची पत्नी व जयवंत यांनीं शांतिपुराला जाण्याची तयारी केली. जयवंत तर तेथील मर्दानी खेळांत व

कदाचित् आपणांस सोडणार नाहीं व मग बापाची आज्ञा पाळण्याच्या कामीं व्यत्यय येईल असें वाटून त्यानें राजाची परवानगी विचारली नाहीं. तें पाहून दरबारी लोक चकित झाले, व मोठी खळबळ उडाली. तेव्हां एकदम "अडवा! अडवा! धरा! धरा!" अशी स्वयंवर मंडपांत आरोळी झाली व राजसेवक घोड्यावर आरूढ होऊन चंद्रकिशोराचा पाठलाग करूं लागले. एक घोडेस्वार तर त्याच्या इतका जवळ गेला कीं, त्यानें आपला भाला चंद्रकिशोराच्या घोड्याच्या पुठ्याला लावला देखील. त्याबरोबर तो घोडा दुप्पट वेगानें पळूं लागला. राजसेवकांनीं एक तास पाठलाग केला. मग चंद्रकिशोराचा घोडा थकत चालला. तेव्हां ओझें हलकें करण्याकरितां त्याला आपल्याजवळील बावांचें चिलखत व शिरस्त्राण जमिनीवर फेकून द्यावें लागलें. त्याचा इष्ट असा परिणाम झाला; तथापि त्यांना त्यानें टाकलेलें चिलखत व शिरस्त्राण सांपडलें तेवढेंच घेऊन ते परत फिरले.

चंद्रकिशोरानें प्रथम गोरक्षमठाकडे जाऊन जखमी झालेला घोडा बावांच्या स्वाधीन केला आणि झालेली हकीकत सांगून त्यांचें चिलखत व शिरस्त्राण निरुपायानें टाकून दिल्याबद्दल त्यांची क्षमा मागितली. पण बावा रागावून म्हणाले, "माझ्या यशस्वी वस्तु तूं अरण्यांत टाकल्यास ही गोष्ट वाईट केलीस. त्या वस्तु मला परत आणून देईपर्यंत, त्यांच्या जोरावर जिंकलेल्या आपल्या नववधूचें पाणिग्रहण करण्यास माझी तुला मनाई आहे."

ह्यावर अतिशय खिन्न होऊन जड पावलानेंच परंतु पित्यापूर्वी चंद्रकिशोर घरीं येऊन पोहोंचला. तो शांतिपुराला गेला होता

हें त्यानें कोणालाही सांगितलें नाहीं व कोणाला तें कळलेंही नाहीं. राजकन्येकडून मिळालेलें शिरस्त्राण व चिलखत त्यानें आपल्या खोलींत ठेविलें आणि आंगठी मात्र आपणाजवळच ठेवून घेतली. पुढें दोन दिवसांनीं चंद्रकिशोरानें नशीब काढण्याकरितां देशांतरीं जाण्याची परवानगी पित्याजवळ मागितली व त्यानेंही बायकोच्या सल्ल्यावरून ती दिली. मग ज्या ठिकाणीं बाबांचें चिलखत टाकलें होतें, त्या ठिकाणीं चंद्रकिशोर प्रथम गेला, पण तें सांपडलें नाहीं. म्हणून त्याच अरण्यांतील कंदमुळें फळें खाऊन खेड्यापाड्यांतून त्यानें आपला शोध चालू ठेवला; कारण तें चिलखत व शिरस्त्राण राजसेवकांनीं घेऊन राजाकडे नेऊन दिलें होतें हें त्यास माहित नव्हतें.

इकडे श्रीवत्सपुरांत जयवंताची आई एके दिवशीं चंद्रकिशोराच्या खोलींत गेली असतां तिला तें नवें बहुमोल शिरस्त्राण व चिलखत दिसलें. तेव्हां, राजकन्येनें वरलेल्या व स्वयंवर-मंडपांतून एकाएकीं पळून गेलेल्या विजयी वीराच्या डोकीस आपण ओझरतें पाहिलेलें शिरस्त्राण तें हेंच असें तिला वाटलें. परंतु तें चंद्रकिशोराच्या खोलींत कसें यावें याचा नीट उलगडा तिला झाला नाहीं. जर चंद्रकिशोरच तो विजयी वीर असेल, तर त्याच्याऐवजीं आपल्या जयवंताला राजापुढें नेऊन त्याचें कल्याण साधावें अशी दुष्ट वासना तिला झाली; कारण ते दोघेही साधारणपणें एकमेकांसारखे दिसत असत. तिनें तें चिलखत व शिरस्त्राण घेऊन जयवंताच्या अंगांत घालून पाहिलें. परंतु त्या वस्तु जयवंताच्या अंगाला लहान होऊं लागल्या. कारण जयवंताचें पोषण लहानपणापासून अधिक चांगलें झालें असल्यामुळें

चंद्रकिशोर नों. क्र. २१

तो आपल्या थोरल्या भावापेक्षां म्हणजे चंद्रकिशोरापेक्षां लहू झालेला होता. तेव्हां तिनें एक युक्ति केली. तिनें जयवंताला उपासतापास करावयास लावून रोड केलें व त्याच्या डोक्याचे सुंदर केस कापून टाकविले, मग त्या वस्तु त्याच्या अंगाला येऊं लागल्या. आतां अशी सर्व तजवीज करून व जयवंताच्या अंगांत तें चिलखत वगैरे घालून त्याची आई त्याला घेऊन शांतिपुराला गेली आणि तिनें "राजकन्येनें स्वयंवरांत वरलेला पति" म्हणून जयवंताला राजापुढें नेलें. राजानें त्याला ओळखण्यासाठीं राजकन्येकडे पाठविलें.

चंद्रकिशोराच्या वियोगदुःखानें कृश झालेल्या त्या राजकन्येनें जयवंताला पाहिलें. तो कांहींसा चंद्रकिशोरसारखा दिसला तरी जयवंत थोडा कमी उंच होता; उपासतापासानें त्याचें मुख व नेत्र निस्तेज दिसत होते आणि जें शिरस्त्राण चंद्रकिशोराच्या सुंदर केशयुक्त मस्तकाला बरोबर बसत होतें, तेंच जयवंताला डोक्याचे केश कापल्यानंतरच योग्य झालें होतें. हा फरक त्या चतुर राजकन्येच्या लक्षांत तेव्हांच आला. जयवंताच्या तोतयेपणाबद्दल आणखी खात्री करून घेण्याकरितां तिनें त्याला दासीमार्फत कांहीं प्रश्न विचारले. स्वयंवर-मंडपांत राजकन्येनें नवीन शिरस्त्राण अर्पण करतांना चंद्रकिशोराचें व तिचें जें थोडेंसें भाषण झालें होतें, त्याविषयीं दासीनें जयवंताला प्रश्न केला. परंतु तें भाषण काय झालें हें जयवंताला कसें सांगतां यावें? त्यानें दडपून कांहीं तरी खोटेंच सांगितलें. शेवटीं राजकन्येनें प्रेमचिन्ह म्हणून दिलेली आंगठी कोठें आहे म्हणून विचारतां त्यानें ती हरवल्याचें सांगून टाकलें. आणि जखमी झालेला काळा घोडा कोठें आहे तें विचारतां

तो मेला असेंही सांगण्याला तो कचरला नाहीं. यावर जयवंताच्या तोतयेपणाबद्दल राजकन्येची खात्री होऊन तिनें राजाकडे असा निरोप पाठविला कीं, " हा मनुष्य तोतया आहे, त्यास कारागृहांत टाकावें. त्याच्या अंगांत असलेलें चिलखत व शिरस्त्राण हीं मात्र मीं स्वयंवर मंडपांत माझ्या पतीला अर्पण केलेलीं तींच आहेत. त्या वस्तु या मनुष्याच्या हातांत कशा आल्या याचा तपास करून त्या आधारें पुढें शोध चालवा. " हा निरोप ऐकून राजानें जयवंत व त्याची आई यांना कैदेंत टाकलें. मग मात्र त्या दोघांचे डोळे उघडले. आपण करावयाला गेलों काय आणि झालें काय असा त्यांना पश्चात्ताप झाला.तेव्हां जयवंताच्या आईचें धैर्य खचून तिनें तें चिलखत चंद्रकिशोराच्या खोलींत सांपडल्याचें कबूल केलें. लागलीच राजाज्ञेवरून चंद्रकिशोराच्या शोधाकरितां गुप्त हेर रवाना झाले आणि त्यांनीं थोड्याच दिवसांत त्याला शोधून काढून शांतिपुरास आणलें.

राजकन्येनें चंद्रकिशोरला तात्काळ ओळखलें; मग तिला जो आनंद झाला, त्याचें काय वर्णन करावें? प्रेमचिन्ह म्हणून चारुशीलेनें दिलेली आंगठी त्याच्या हाताच्या बोटांत होतीच. त्यानें गोरक्षमठाकडे राजसेवक पाठवून बावांस आणविलें व राजाच्या ताब्यांत असलेलें शिरस्त्राण व चिलखत बावांचें बावांस परत दिलें. मग बावांनीं चंद्रकिशोराला गुप्तपणें शिक्षण कसें दिलें होतें व चिलखत, भाला व घोडा ही कशीं उसनीं दिलीं होतीं हें राजाला निवेदन केलें; व पुठ्ठ्यावर जखमी झालेला घोडाही दाखविला. अशा रीतीनें सर्वांची खात्री पटून लवकरच चंद्रकिशोर व चारुशीला यांच्या विवाहाचा सोहळा मोठ्या थाटाचा करण्यांत

आला. त्या समयीं जयवंत व त्याची आई यांस चंद्रकिशोराच्या विनंतीवरून राजानें क्षमा केली. पुढें चंद्रकिशोरानें स्वपराक्रमानें दक्षिणेंतील नवीन प्रदेश जिंकून त्या ठिकाणीं चारुशीलेसह पुष्कळ वर्षें सुखानें राज्य केलें. गोरक्षमठांतील गोसावी बावाही आमरण चंद्रकिशोराजवळ राहून युद्धप्रसंगीं त्याला सल्लामसलत देत असत. जयवंताच्या आईनें किती जरी बेमालुम कपट केलें, तरी तें उघडकीला येऊन तिला शेवटीं अपयश आलें आणि जरी पित्यानें चंद्रकिशोराची उपेक्षा केली, तरी तो आपल्या गुणांनीं व प्रयत्नानें चांगल्या पदवीला पोहोंचला.

## प्रियंवदेचे प्रश्न.

जाईची जी कळी कोंवळीं त्वां खुडिली वाया,
येइल का ती यथापूर्व तुज लतेस जोडाया ?
चुरले सुंदर पंख तुवां जे फूलपांखराचे,
येइल का ते नीट कराया तुजला ? वद साचें ?
आज उपवनीं निज पायाशीं आंबा जो पडला,
येइल का तो पुनरपि देंठावर लावायाला ?
एक वेळ जें तुटलें नाजुक कोळ्याचें जाळें,
येइल का तें तुजला फिरुनी सांधाया सगळें ?
गळल्या कोमळ सकळ पाकळ्या रम्य गुलाबाच्या,
येतील तुला बसवाया का ठायीं ठायींच्या ?
काढुनिया मध मधमाशांच्या मोहोळांतील
मेणामधिं तो यथापूर्व का भरतां येईल ?

प्रश्न तुला हे क्षुद्र वाटती, तरी लाडक्या रे !
एक आणखी हा ऐकुनि दे उत्तर सुविचारें.
कठोर करणी करुनि, न केली ऐसें होइल का ?
अपशब्दाचा शर सुटतां तो परतुनि येइल का ?

## वज्रबाहु.

कमलापूर सह्याद्रीच्या एका फांट्यावर वसलें होतें. तेथें धीरेंद्र नांवाचा एक दयाळू व न्यायी राजा राज्य करीत होता. त्याची राणी कुसुमावती हिच्या ठिकाणीं त्याचें निःसीम प्रेम होतें. तिला एक मुलगी इंदिरा व एक मुलगा वज्रबाहु अशीं दोन मुलें झालीं. इंदिरेला दहावें व वज्रबाहूला पांचवें वर्ष लागलें, तोंच त्यांच्या दुर्दैवानें राणी कुसुमावती आजारी पडली. आतां आपण फार दिवस वांचत नाहीं असें पाहून राणीनें एका विश्वासू सरदाराला बोलावून आणून त्याच्या पदरांत तीं दोन्हीं मुलें घातलीं. राजा धीरेंद्र कदाचित् दुसरें लग्न करील आणि मग आपल्या मुलांना अपाय होईल अशी भीति राणी कुसुमावतीला वाटली. म्हणूनच तशा प्रसंगीं आपल्या मुलांचें रक्षण करण्याबद्दल तिनें त्या सरदाराकडून वचन घेतलें.

यानंतर लवकरच ती राणी मरण पावली. राजानें मलयागिरीपतीची कन्या गौरमुखी हिच्याबरोबर दुसरें लग्न केलें. प्रथम कांहीं दिवस सुरळीत गेले. परंतु गौरमुखीला एक मुलगा झाल्या-

नंतर इंदिरा व वज्रबाहु यांची काळजी कोणीच घेईना. त्यांपैकीं वज्रबाहूच्या प्राणालासुद्धां धोका आहे असें जेव्हां त्या वचनबद्ध सरदाराला दिसूं लागलें, तेव्हां तो आपल्या वचनाला जागला. त्यानें एके दिवशीं रात्रीं लहानग्या वज्रबाहूस आपल्यापुढें घोड्यावर घेतलें आणि तो ब्रह्माश्रमाला गेला. तेथें अरण्यांत वत्साचार्य नांवाचे एक कुलपति असत. त्यांच्या स्वाधीन वज्रबाहूला करून तो कोणाचा मुलगा वगैरे हकीकत त्या सरदारानें त्यांना सविनय सांगितली व वज्रबाहु सज्ञान होईपर्यंत ती हकीकत गुप्त ठेवण्याबद्दल त्यांना विनंति केली. त्यांनीं ती विनंति मान्य केल्यावर तो सरदार एकटाच कमलपुरांत गेला.

कुलपति वत्साचार्य यांनीं वज्रबाहूला उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें. त्यांनीं त्याला अनेक विद्यांचीं मूलतत्वें शिकविलीं आणि राजनीतीचें व व्यवहाराचेंही विशेष शिक्षण दिलें. विश्वाचा कर्ता एकच असून सर्व मनुष्यप्राणी धर्माच्या दृष्टीनें जन्मतः समानाधिकारी आहेत हें तत्व वज्रबाहूच्या मनावर चांगलें ठसलें. तथापि त्याला अवश्य असें युद्धविद्येचें शिक्षण देण्याला वत्साचार्य असमर्थ होते. इतक्यांत पीतांगशर्मा नांवाचा एक प्रवासी त्या आश्रमांत आला आणि वत्साचार्यास स्वेच्छेनें सहाय्य करूं लागला. त्यानें वज्रबाहूस युद्धविद्येंत प्रवीण केलें, इतकेंच नव्हे, तर त्याची हुशारी पाहून त्यास एक मोठी यशस्वी तलवार दिली. मात्र तिचा स्वीकार करतांना, "या तलवारीचा उपयोग दुर्जनांना दंड करण्याकडे व आत्मसंरक्षणाकडेच करीन; लोभाच्या आधीन होऊन स्वार्थाकरितां तिचा उपयोग करणार नाहीं." असें वचन वज्रबाहूला द्यावें लागलें.

इतक्या गोष्टी होईतों बारा वर्षें निघून गेलीं. नंतर गुरूच्या आज्ञेवरून वज्रबाहु हा आपल्या देशांत कांहीं दिवस प्रवास करण्याकरितां निघाला.

सुमारें आठ दिवस वाट चालल्यानंतर तो भीमपूर नांवाच्या एका शहरांत येऊन दाखल झाला. तेथें त्याला असें समजलें कीं तेथील अन्यायी राजा आपलें स्वतःचें ऐश्वर्य वाढावें म्हणून शक्तीचा उपासक झाला आहे. तो ठिकठिकाणचीं माणसें फसवून आणून कैदेंत ठेवीत असे व नियमित वेळीं त्यांचा बळी देवाला देत असे. त्याचे सरदारही त्याच पंथाचे होते. जगांत इतका दुष्टपणा आहे व देवाच्या नांवावर असलीं क्रूरपणाचीं कृत्यें होतात ही गोष्ट वज्रबाहूला आतांच प्रथम समजली. परंतु आपल्या एकट्याच्या हातून या बाबतींत कांहीं होणार नाहीं हें जाणून तो तें शहर सोडून दुसरीकडे गेला. कांहीं दिवस पुनः प्रवास केल्यावर तो कांहीं व्यापाऱ्यांच्या संगतीनें मार्ग चालत असतां ते सर्व एका खिंडींत येऊन पोहोंचले. इतक्यांत त्यांच्यावर दरवडेखोर लोकांनीं हल्ला केला. ते व्यापारी जरी त्या काळच्या वहिवाटीप्रमाणें हत्यारबंद होते, तरी दरवडेखोरांच्या बळकट जमावापुढें त्यांचें कांहीं चालण्यासारखें नव्हतें. परंतु आमच्या वज्रबाहूच्या यशस्वी तलवारीनें कित्येक दरवडेखोर लोळविले आणि त्यांचा पराभव होऊन ते शरण आले. वज्रबाहूनें त्यांच्या मुसक्या बांधून त्यांस पुढें चालविलें आणि त्यांच्या निवासस्थानाकडे म्हणजे जंगलांतील एका गढीकडे त्या व्यापाऱ्यांसह जाऊन त्या दरवडेखोरांनीं सांठविलेली पुष्कळ संपत्ति त्यानें आपल्या ताब्यांत घेतली.

आतां दोन समजुतीच्या गोष्टी सांगून व मिळालेल्या संपत्तीपैकीं वांटा देऊन वज्रबाहूनें त्या व्यापाऱ्यांना त्या गढींत आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि त्यांचीं मुलेंमाणसें आणवून त्या ठिकाणीं वज्रपुरी नांवाचें एक सुंदर शहर वसविलें. नंतर त्यानें आपल्या पदरीं वरेच लोक ठेविले आणि थोड्याच दिवसांत आसपासच्या प्रदेशांत चांगला बंदोबस्त करून आपली सत्ता स्थापन केली.

मग त्याला त्या भीमपुरच्या दुष्ट राजाची आठवण झाली. त्यानें त्याचें शासन करण्याचा निश्चय केला व आपले सर्व लोक जमवून भीमपुराकडे फार त्वरेनें चाल केली. भीमपुराजवळ गेल्यावर त्यानें एक युक्ति योजिली. त्यानें कांहीं बैलगाड्यांत गवत रचविलें व त्यामध्यें हत्यारें लपवून ठेवून त्या गाड्या संध्याकाळीं थेट राजवाड्यासमोरच्या पटांगणांत नेण्यास आपल्या कांहीं सैनिकांस सांगितलें. व तो स्वतः आणि बाकीचे सैनिक निरनिराळ्या मार्गांनीं शहरांत शिरले. अंधार पडण्याचे सुमारास ते सर्व राजवाड्यासमोर गोळा झाले आणि त्यांनीं एकदम राजवाड्यास वेढा दिला.

राजाचे लोक आधींच बेसावध होते. तशांत अंधार पडल्यामुळें हा हल्ला कोणीं केला व हल्ला करणारे लोक किती आहेत हें कोणास कळेना. त्यांनीं वज्रबाहूच्या लोकांना थोडा प्रतिबंध केला, पण व्यर्थ. थोड्याच वेळांत राजा आणि त्याचे पुत्र कैद झाले. या हल्ल्याची बातमी शहरांत पसरते न पसरते तोंच तिच्या मागोमाग अशीही भूमका उठली कीं, " राजा आपल्या पुत्रांसह शहराबाहेर पळून गेला. " या भूमकेमुळें राजाला मदत करण्याला जे थोडे लोक तयार होते, ते रात्र संपण्यापूर्वीच आपल्या

राजाला जाऊन मिळण्याकरितां म्हणून शहर सोडून निघून गेले. याप्रमाणें सर्व शहर वज्रबाहूच्या ताब्यांत गेलें. त्यानें दुसऱ्या दिवशीं त्या अन्यायी राजाच्या विरुद्ध असलेल्या त्या शहरांतील लोकांची सभा भरविली व तींत भाषण केलें. तो म्हणालाः—

" मित्रहो ! तुमच्या राजाचीं क्रूरपणाचीं कृत्यें बंद पाडण्याकरितां आम्हीं त्याला कैद केलें आहे. आम्हांला स्वतःला राज्यलोभ नाहीं. तुम्हीं आतां योग्य त्या पुरुषाला राजा करावें. मात्र मनुष्यबली व तसलींच दुसरी क्रूरपणाचीं कृत्यें बंद ठेवावीं. ईश्वर दयाळू असल्यामुळें त्याला रक्ताचा नैवेद्य आवडत नाहीं. ईश्वर एकच असल्यामुळें निरनिराळ्या स्वभावाचीं व निरनिराळ्या आवडीनावडीचीं क्रूर दैवतें कल्पून त्यांची पूजा करणें अयोग्य आहे; शक्तीपेक्षां ज्ञान हें दैवत श्रेष्ठ आहे. तुमच्या नवीन राज्यव्यवस्थेची घडी नीट बसण्याकरितां चार दिवस येथें राहून पुढें आम्हीं आमच्या लोकांसह परत जाणार आहों. "

वज्रबाहूच्या या भाषणाचा लोकांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला. त्यांनीं त्यालाच आपला राजा होण्याबद्दल विनंति केली. परंतु ती नाकारून तो चार दिवसांनीं आपल्या वचनाप्रमाणें वज्रपुरीस परत गेला. याप्रमाणें एक हेतु सिद्धीस गेल्यानंतर वज्रपुरीच्या बंदोबस्ताकरितां प्रतिनिधि नेमून तो गुरूच्या आज्ञेप्रमाणें पुनः प्रवासास गेला. मात्र या खेपेस त्यानें आपणाबरोबर थोडे सशस्त्र लोक घेतले होते. अनेक प्रेक्षणीय स्थळें व विद्यापीठें पाहत पाहत तो एके दिवशीं एका मोठ्या नगरांत येऊन पोंहचला. तेथील राजानें नेमिलेल्या न्यायाधीश-मंडळापुढें जुन्या मताच्या

कर्मठ लोकांनीं व उपाध्याय वर्गानें फिर्याद केल्यावरून शक्रतीर्थ नांवाच्या एका सत्पुरुषावर बरेच दिवस खटला चालला होता व त्याचा निकाल त्याच दिवशीं होऊन त्या पुरुपास देहांत शिक्षा फर्माविण्यांत आली होती. त्या पुरुषानें अनेक विद्यांचा अभ्यास केला होता आणि पुराणें व त्या वेळचें ज्योतिषशास्त्र यांत त्यास पुष्कळ चुका आढळून आल्या होत्या. त्याचप्रमाणें आपल्या पुष्कळ सामाजिक चालीरीति त्याला त्याज्य वाटत होत्या, व नवीन कालाला अनुसरून धर्मसुधारणा केली पाहिजे, याविषयीं तरुण मंडळीपाशीं तो उघड बोलत असे. तसेंच ज्या पवित्र ग्रंथांचा विचार करण्यास उपाध्याय वर्गानें त्याला केवळ जातिभेदामुळें प्रतिबंध केला होता त्या ग्रंथांचा त्यानें विचार केला म्हणून पाखंडमताचा आरोप ठेवून त्यास वरील शिक्षा देण्यांत आली होती. ही शिक्षा अमलांत आणण्याचा प्रकारही भयंकर होता. जमिनींत एक दगडी पक्कें थडगें तयार करून त्यांत त्यास जीवंतपणीं ठेवून त्या थडग्याच्या तोंडावर एक मोठी शीला ठेवायची होती. उद्देश हा कीं, अन्नपाण्यावांचून हाल हाल होऊन त्याचा प्राण सावकाश जावा आणि अशा रीतीनें त्याच्या प्रच्छन्न अनुयायांस दहशत बसावी.

ही सर्व हकीकत वज्रबाहूस एका नागरिकाकडून सहजासहजीं समजली. तेव्हां त्याला त्या पुरुपाची दया आली. कोणतीही शिक्षा होण्यासारखा त्याचा अपराध आहे असें वज्रबाहूस मुळींच वाटलें नाहीं; शास्त्रें, कला आणि सामाजिक चालीरीति यांविषयीं विचार करण्याला प्रत्येकाला स्वातंत्र्य असावें, जीवितयात्रेचा मार्ग सर्वांना खुला असावा, असें त्याचें मत होतें. कर्मठ उपाध्याय वर्गानें

परमतसहिष्णुता दाखविली नाहीं तरी राजा व न्यायाधीश यांनीं ती दाखविणें आवश्यक होतें, असें त्याला वाटलें; म्हणून त्यानें त्या पुरुषाला वांचविण्याचा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं न्यायाधीशाच्या निकालाप्रमाणें शक्रतीर्थ याला थडग्यांत गाडण्यांत आलें. त्याचा कोणीं वलाढ्य पक्षपाती नसल्यामुळें त्या थडग्याच्या रक्षणाकरितां फक्त वीस पहारेकरी ठेवण्यांत आलें होतें. ही गोष्ट आमच्या वज्रबाहूच्या चांगलीच पथ्यावर पडली. तो आपल्या नोकरांसह रात्रीं तेथें गेला आणि त्यानें एकदम पहारेकऱ्यांवर छापा घालून त्यांचा पराभव केला व थडग्यावरील शिला एकीकडे ढकलून शक्रतीर्थास बाहेर काढलें आणि तो त्यासह त्वरेनें दूरदेशीं निघून गेला. या उपकाराबद्दल शक्रतीर्थाला किती तरी कृतज्ञता वाटली. शिवाय शक्रतीर्थाच्या सदुपदेशामुळें लोकभ्रम व देवभोळेपणा यांचें निरसन होऊन जनतेचाही फायदा झाला.

याप्रमाणें कांहीं दिवस प्रवास केल्यानंतर वज्रबाहु ब्रह्माश्रमाकडे वत्साचार्य व पीतांगशर्मा यांस भेटावयास परत आला. त्यांनीं सर्व हकीकत ऐकून घेतली आणि मोठा संतोष व्यक्त केला. नंतर वत्साचार्य म्हणाले, “बाळा वज्रबाहु, आम्ही दिलेल्या तलवारीचा तूं सदुपयोग केलास. तूं आपल्या प्रवासांत नेहमीं सत्पक्षच घेतलास, यावरून राजाला योग्य गुण तुझ्या अंगीं आहेत असें दिसून येतें. जो सत्तेचा सदुपयोग करील, त्याच्या हातीं सत्ता देणें योग्य असतें; म्हणून तुझें जन्मरहस्य आम्हीं तुला आतां सांगतों. तूं कमलापुरच्या धीरेंद्र राजाचा पुत्र आहेस.” अशी सुरवात करून आचार्यांनीं राणी कुसुमावतीच्या विश्वासू सरदाराच्या

मुखानें ऐकलेली सर्व हकीकत वज्रबाहूला सांगितली. ती ऐकून, संपत्तीच्या लाभानें हर्ष होण्याच्या ऐवजीं आपल्या शिरावर मोठीच जबाबदारी आहे असें वज्रबाहूला वाटलें. तो पुष्कळ दिवस वियोगदुःख पावलेल्या आपल्या पित्याच्या व भगिनीच्या भेटीकरितां फार उतावीळ झाला. म्हणून उभय गुरूंचा आशिर्वाद घेऊन अगदीं निवडक सेवकांसह तो कमलापुरास गेला. तेथें राजा धीरेंद्र पूर्ण परावलंबी झाला होता. सर्व राज्यकारभार राणी गौरमुखी हीच पाहत होती. तिला पांच मुलगे झाले होते. ते सर्व अतिलाडानें बिघडले होते. अर्थात् राज्यांत चहूंकडे बेबंदशाही माजली होती. त्याची बहीण इंदिरा एका छोट्या सरदाराला दिली होती व तीं उभयतां नवराबायको शहराबाहेर एका बागेंतील बंगल्यांत राहिलीं होतीं.

वज्रबाहू एकटाच प्रथम आपल्या भगिनीच्या निवासस्थानाकडे गेला, तों तेथील नोकरचाकर अगदीं खिन्न होऊन बसलेले त्याला दिसले; म्हणून तपास करतां तिचा नवरा आजारी पडून बिछान्याला खिळला असें त्याला समजलें. मग वज्रबाहूनें आंत असा निरोप पाठविला कीं, "बाहेर कोणी एक वैद्य आला आहे, तो यजमानसाहेबांस उपचार करून बरें करण्याची हिंमत बाळगीत आहे." आंतून परवानगी आल्यावर वज्रबाहू आजाऱ्याच्या खोलींत गेला. तेथें दोन वैद्य स्तब्ध बसले होते. सरदारसाहेबांची स्थिति बरीच कठीण झाली होती व वज्रबाहूची बहीण डोळ्यांत अश्रु आणून त्याच्या पायापाशीं बसली होती. त्या दोन वैद्यांनीं वास्तविक या नव्या वैद्याला आपली कर्तबगारी दाखविण्यास संधि दिली नसती; परंतु वज्रबाहूचा निष्कपट व अलौकिक तेजयुक्त चेहरा

पाहून त्यांनीं ती संधि दिली. प्रवासांत स्वतःच्या उपयोगी पडावें म्हणून वज्रबाहूनें "अमृतप्राश" नांवाचें एक दिव्य दुर्मिळ औषधी सरबत आपल्याबरोबर बाळगलें होतें. त्याचाच त्याला आतां उपयोग झाला. सरदारसाहेबांनीं सरबत घेतल्यानंतर कांहीं वेळानें त्यांना गाढ झोंप लागली व एक प्रहरानें जागे झाल्यावर त्यांना थोडें बरें वाटून त्यांचा चेहरा सतेज दिसूं लागला. त्यांना एकदम क्षुधा लागल्यासारखें वाटलें. म्हणून थोडेंसें दूध घेतल्यानंतर तर त्यांना पुष्कळच बरें वाटलें.

आतां इंदिरेचा आनंद काय विचारावा? ती कृतज्ञतापूर्वक वज्रबाहूस नमन करावयास उठली, तेव्हां तिला थांबवून आपणच नमन करून तो म्हणाला, "आक्का, तूं मला ओळखलें नाहींस, तुझा हरवलेला धाकटा भाऊ वज्रबाहू मी तुझ्यापुढें उभा आहें."

इंदिरेनें आपल्या नेत्रांतील आनंदाश्रु पुसून त्याला निरखून पाहिलें आणि म्हटलें, " खरेंच मी स्वप्नांत आहें काय? नाहीं. हा वज्रबाहुच आहे. तोच हा गौरवर्ण, तेच हे पाणीदार डोळे, तेंच हें हंसतमुख? भाऊराया, केवढें हें माझें भाग्य! या संकटसमयीं तूं धांवून आलास. तूं माझा भाऊ खरा!" या आनंदाच्या प्रसंगीं साहजिकपणेंच त्या उभय बंधुभगिनीला आपल्या मृत मातेची आठवण होऊन दुःख झालें! इंदिरेच्या पतीनें त्यांचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला आणि आजाऱ्याकडे लक्ष देऊन त्यांनींही चटकन् आपला शोक आवरला. यानंतर सरदारसाहेबांची प्रकृति झपाट्यानें सुधारत गेली हें सांगावयास नकोच.

त्याच दिवशीं वज्रबाहू प्रथम राणी कुसुमावतीच्या त्या विश्वासू सरदाराकडे गेला. त्यानें वज्रबाहूस लागलेंच ओळखलें, आणि ते उभयतां आपल्या शरीररक्षकांसह राजवाड्यांत गेले. राजा धीरेंद्र याची दृष्टि जरी मंद झाली होती तरी आपल्या पुत्राला ओळखण्याइतकी ती शाबूत होती. त्यानें वज्रबाहूला पोटाशीं धरलें, त्याचें मस्तक हुंगलें आणि त्याला आपल्याजवळ बसवून घेतलें. राजाला राणी कुसुमावतीच्या सहवासांत घालविलेल्या सुखमय दिवसांची आठवण होऊन त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. राणी गौरमुखीनेंही युवराज वज्रबाहू परत आल्याबद्दल वरकरणीं मोठा आनंद दाखविला. परंतु आपल्याच पुत्राला राज्य मिळावें अशा लोभानें तिनें एके दिवशीं युवराज वज्रबाहूस विषान्न चारण्याचा प्रयत्न केला. अन्न वाढणाऱ्या दासीच्या चुकीमुळें विषाचे पदार्थ वज्रबाहूजवळ बसलेल्या गौरमुखीच्या एका पुत्राच्याच पानांत पडले आणि तें कृत्य तिच्या मोठ्या शोकाला कारण झालें. यानंतर तिनें व तिच्या चार पुत्रांनीं फिरून एकदां युवराज वज्रबाहूचा वध करण्याचा कट कसा केला, तो अपक्व दशेंत उघडकीस कसा आला आणि त्यामुळें त्यांना कांहीं दिवस कैदेंत कसे काढावे लागले, ही हकीकत पाल्हाळानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. युवराज वज्रबाहूनें त्या विश्वासू सरदाराच्या सुंदर व सुशील कन्येबरोबर विवाह केला आणि योग्य समयीं स्वतः राजा झाल्यावर त्यानें न्यायानें व लोकमताला अनुसरून राज्य केलें. त्यानें अनेक तलाव, धर्मशाळा, रस्ते व विद्यामंदिरें बांधलीं व प्रजेला सुख लागेल अशी हरएक तजवीज केली.

म. सं. मं. ग्रं. ग्रंथालय शाखा.
ग्र. क्र. २५२७ दि. ..............
वि. .......... प्रा. धा. ..............

IRBK-0102527

IRBK-0102527

## बालवाचकांकरितां आमचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | आई ( माधव कामत ) | ०—५-० |
| २ | विक्रमाची साडेसाती ( ताराबाई मोडक ) | ०—८-० |
| ३ | जादूचा घोडा ( ,, ) | ०—४-० |
| ४ | सवाई विक्रम ( ,, ) | ०—५-० |
| ५ | गारांचा पाऊस ( शं. रा. देवळे ) | ०—४-० |
| ६ | गंपूदादाचा लाकूडदांड्या ( ताराबाई मोडक ) | ०—५-० |
| ७ | वानरांची सर्कस ( वसंत वैद्य ) | ०—४-० |
| ८ | प्रवासी गलिव्हर ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—६-० |
| ९ | तीन पण व इतर गोष्टी ( वेंबळकर ) | ०—५-० |
| १० | चतुर तुतारीवाला ( वेंबळकर ) | ०—५-० |
| ११ | अजितकुमार ( ताराबाई जाधव ) | ०—४-० |
| १२ | रत्नकंकण ( ,, ) | ०—४-० |
| १३ | पालखी ( वसंत वैद्य ) | ०—५-० |
| १४ | मजेदार कथा ( यदुनाथ थत्ते ) | ०—६-० |
| १५ | नूतन नीतिकथा भाग १ ( गो. वा. पंडितराव ) | ०-१०-० |
| १६ | ,, ,, ,, २ ( ,, ) | ०-१०-० |
| १७ | हिरवा पक्षी ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—५-० |
| १८ | चिमण्या कळ्या भा. १ ला ( मालतीबाई दांडेकर ) | ०—५-० |
| १९ | ,, ,, २ रा ( ,, ,, ) | ०—५-० |
| २० | सुनंदा ( अक्कलकोटकर ) | ०—५-० |
| २१ | एका रात्रींत देऊळ ( यदुनाथ थत्ते ) | ०—८-० |
| २२ | तान्या आणि वान्या ( ग. कृ. गणेश जोशी ) | ०—५-० |
| २३ | जादूचा मंत्र ( सौ. विद्या सिधये ) | ०—५-० |
| २४ | पिंजऱ्यांतील प्राण ( र. म. जोशी ) | ०—४-० |
| २५ | चिमण्यांची चिवचिव ( सौ. शांताबाई पेंडसे ) | ०—४-० |
| २६ | रोझा ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—४-० |
| २७ | बुकर टी. वॉशिंग्टन ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—५-० |
| | बिरबल भा. १ व २ प्रत्येकी | ०—८-० |
| | सुलभ महाभारत भा. १ ते ६ ,, | ०—८-० |

## शिशुसाहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | कांचनगंगा ( मो. वाळिंबे ) | ०—४-० |
| २ | निळें आकाश ( ,, ) | ०—५-० |
| ३ | रुपेरी किरण ( ,, ) | ०—४-० |
| ४ | सात तारका ( ,, ) | ०—४-० |

महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि., मुंबई ४